पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

अधिक मास अधिक खास
चांदीच्या जोडवी मजुरीवर 100% सूट
ऑफर कालावधी - १७ मे ते १५ जून २०२६
काजळे ज्वेलर्स
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२८ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । २८/०५/२०२६ । पान -६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## कश्यपी धरणात संगमनेरच्या दांपत्यासह चौघांचा बुडून मृत्यू

**पिंपरणे गावावर शोककळा**

### धाडसी महिलेच्या प्रसंगावधानामुळे दोन वर्षीय बालिकेचे प्राण वाचले



युवावार्ता (प्रतिनिधी)

पिंपरणे - नाशिक-हसूल रस्त्यावरील कश्यपी धरण परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथील दांपत्यासह चार जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेमुळे पिंपरणे गावावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या दुर्घटनेत सचिन कैलास ठोंबरे (वय ३२), त्यांची गर्भवती पत्नी रोहिणी सचिन ठोंबरे तसेच शेजारी राहणारे केतन अनिल पवार (वय १६) आणि कौशल्य अनिल पवार (वय १४) यांचा मृत्यू झाला. मात्र, ठोंबरे दांपत्याची दोन वर्षीय चिमुकली बालिका धाडसी महिलेच्या तत्परतेमुळे थोडक्यात बचावली.

मिळालेल्या माहितीनुसार, ठोंबरे कुटुंब शेजारी राहणाऱ्या पवार कुटुंबासोबत सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कश्यपी धरण परिसरात गेले होते. याचदरम्यान ही दुर्दैवी घटना घडली. घटनेच्या वेळी धरण परिसरात उपस्थित असलेल्या संगिता घाडगे यांनी प्रसंगावधान राखत मोठे धाडस दाखवले. त्यांनी सांगितले की, आम्ही धरणकाठावर उभे असताना एक लहान मुलगी रडत 'मम्मी-पप्पा' म्हणत पाण्याकडे बोट दाखवत होती. संशय आल्याने त्यांनी तत्काळ पाण्याकडे धाव घेत बालिकेला सुरक्षित बाहेर आणले. त्यानंतर परिसरात पडलेल्या चपला पाहून कुणीतरी पाण्यात बुडाल्याचा संशय अधिक बळावला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि तरुणांनी तातडीने धरणात उड्या घेत शोधकार्य सुरू केले. काही वेळानंतर चौघांना पाण्याबाहेर काढण्यात आले. मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, धरणालगतच्या गावात कुस्ती स्पर्धा सुरू असल्याने परिसरात मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

सचिन ठोंबरे हे व्यवसायाने सिव्हिल इंजिनिअर होते. मूळचे संगमनेर तालुक्यातील ठोंबरे वस्ती, पिंपरणे येथील रहिवासी असलेले ठोंबरे कुटुंब गेल्या दोन वर्षांपासून नाशिकमधील म्हसरूळ-मखमलाबाद नाका परिसरात वास्तव्यास होते. सुट्टीच्या दिवशी फिरण्यासाठी गेले असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. या प्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन बोर्से यांनी सांगितले की, ठोंबरे आणि पवार कुटुंब फिरण्यासाठी आले होते. घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

## पद्मश्रीचा सन्मान म्हणजे तमाशा कलेचा गौरव - आ. सत्यजीत तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरच्या सांस्कृतिक इतिहासातील अभिमानाचा क्षण ठरलेल्या पद्मश्री पुरस्कार विजेते रघुवीर खेडकर यांचे संगमनेरमध्ये उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार सत्यजीत तांबे यांनी त्यांचा सत्कार करताना भावनिक शब्दांत गौरव केला. कार्यक्रमास संगमनेर नगराध्यक्षा मैथिली तांबे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

ज्या दिवशी दूरदर्शनवर पद्मश्री पुरस्काराची घोषणा झाली, त्या क्षणापासून संपूर्ण संगमनेरकरांसाठी तो अभिमानाचा दिवस ठरला. संगमनेरचा पहिला पद्मश्री म्हणून मिळालेला हा मान संपूर्ण शहरासाठी गौरवाची बाब आहे. आज प्रत्यक्ष पद्मश्री पदक संगमनेरमध्ये येताना पाहून अंगावर काटा उभा राहतो, असे आमदार तांबे म्हणाले.

यावेळी त्यांनी पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या परिवारातील जपलेली माणुसकी आणि ऋणानुबंधांचा विशेष उल्लेख केला. कराड येथे दौऱ्यावर असताना माजी खासदार श्रीनिवास पाटील यांच्याशी झालेल्या भेटीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, रघुवीर खेडकर यांच्या आई ज्येष्ठ लोककलावंत कांताबाई यांनी अडचणीच्या काळात मदतीसाठी श्रीनिवास पाटील यांच्याकडे धाव घेतली होती. त्यावेळी त्यांनी केलेली मदत कांताबाईंनी आयुष्यभर स्मरणात ठेवली. ज्यांनी आयुष्यात साथ दिली, त्यांना कधीही न विसरणे, हे या परिवाराचे वैशिष्ट्य आहे.

तसेच, पहिला मान गावाचा आणि नंतर परिवाराचा, अशी भावना व्यक्त करणाऱ्या परिवाराच्या मनाच्या मोठेपणाचे कौतुक करताना आमदार तांबे म्हणाले की, हा मोठेपणा त्यांच्या कलेत, स्वभावात आणि वागण्या-बोलण्यातूनही जाणवतो.

देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेला पद्मश्री पुरस्कार हा केवळ रघु भाऊंचा सन्मान नाही, तर तमाशा क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कलावंताचा गौरव आहे. या सन्मानामुळे येत्या काळात तमाशा आणि लोककला क्षेत्राला नवे चांगले दिवस येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## सुनंदा सानप यांना 'आदर्श सरपंच पुरस्कार



**महाराष्ट्र स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या २०२६ ग्रामसर्वेक्षणात सरपंचांचा मागील सहाच महिन्यांचा कालावधी अन् त्यादरम्यान गावात झालेली विकासकामे लक्षात घेता संगमनेर तालुक्यातून आपल्या कऱ्हे गावच्या सरपंच सौ.सुनंदा सुभाष सानप यांना पंजाबराव डख यांच्या हस्ते या वर्षीचा आदर्श सरपंच पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले.**

संगमनेर - महाराष्ट्र स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २०२६ च्या ग्रामसर्वेक्षणामध्ये संगमनेर तालुक्यातील कऱ्हे गावच्या सरपंच सौ. सुनंदा सुभाष सानप यांची 'आदर्श सरपंच पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली. मागील सहा महिन्यांतील उल्लेखनीय विकासकामे, ग्रामविकासासाठी राबविण्यात आलेले उपक्रम, लोकसहभागातून उभारलेली कामे तसेच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सन्मान पंजाबराव डख यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते तसेच महाराष्ट्र स्वराज्य सरपंच सेवा संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार जाहीर होताच कऱ्हे गावासह संपूर्ण संगमनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सौ. सुनंदा सानप यांच्या कार्यकाळात कऱ्हे गावामध्ये विविध विकासकामांना गती मिळाली आहे. विशेषतः स्मशानभूमी सुशोभीकरणाचे काम प्रभावीपणे पूर्ण करण्यात आले. यामध्ये सेवानिवृत्त ग्रुपचा सहभाग उल्लेखनीय होता. गावाच्या सौंदर्यात भर घालणारे तसेच नागरिकांसाठी आवश्यक असलेले हे काम ग्रामस्थांच्या समाधानाचे कारण ठरले. याशिवाय कऱ्हे फाटा ते ग्रामपंचायत कार्यालय या मार्गाचे डांबरीकरण करून वाहतुकीची सुविधा अधिक सुकर करण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गावातील डाळिंबी ते पठार वस्ती, पानंद रस्ता परिसरात स्टेट लाईटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला आहे. तसेच गावात वृक्षलागवडीचा उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. दलित वस्ती चावडीचे काम पूर्ण करण्यात आले असून, ग्रामस्थांसाठी नवीन सभामंडप उभारण्याचा प्रस्ताव खासदार निधीतून मंजूर व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचबरोबर गावातील पानंद रस्त्यांची कामेही प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत. गावातील युवक आणि विद्यार्थ्यांसाठीही सौ. सानप यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. अकॅडमीतील मुलांसाठी स्वतंत्र ग्राउंड तयार करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला असून, खेळाडूंना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण भागातील युवकांना खेळाच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. सौ. सुनंदा सानप यांनी केवळ विकासकामांवर भर न देता सामाजिक सलोखा टिकविण्याचे कार्यही प्रभावीपणे केले आहे. गावातील सर्व धर्मीयांच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक ऐक्य जपण्याचे काम त्यांनी केले. गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास आणि आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे.

उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येवरही त्यांनी प्रभावी उपाययोजना केल्या. वाडी-वस्त्यांवरील नागरिकांना जलजीवनच्या माध्यमातून वाडी वस्तीवर पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले. कोणत्याही नागरिकाला पाण्यासाठी त्रास सहन करावा लागू नये, यासाठी त्यांनी प्रशासनासोबत समन्वय साधत तातडीने उपाययोजना केल्या. त्यामुळे अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला.

स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, सामाजिक उपक्रम आणि ग्रामविकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सौ. सानप यांनी गावाच्या विकासाला गती दिली. समाजमुखी दृष्टिकोन ठेवत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर त्यांनी भर दिला. वृद्ध, दिव्यांग, महिला तसेच गरजू नागरिकांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. ग्रामविकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतल्यामुळे त्यांचे कार्य सर्व स्तरातून कौतुकास पात्र ठरत आहे.

या पुरस्कार निवडीबद्दल मा. महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजितदादा तांबे, मा. आ. डॉ. सुधीरजी तांबे, रणजितसिंह देशमुख, राजहंस दूध संघाच्या चेअरमन, डॉ. जयश्रीताई थोरात तसेच इंद्रजीत भाऊ थोरात यांनी सौ. सुनंदा सानप यांचे अभिनंदन केले. विविध मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशाच प्रकारे ग्रामविकासाची वाटचाल सुरू ठेवावी, अशा शुभेच्छा दिल्या. पुरस्कार स्वीकारल्यानंतर सौ. सुनंदा सानप यांनी हा सन्मान संपूर्ण कऱ्हे ग्रामस्थांचा असल्याचे सांगितले. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळेच विकासकामे पूर्ण होऊ शकली असून, भविष्यातही गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या या यशामुळे कऱ्हे गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यामध्ये त्यांचे पती सुभाष सानप यांचेसह उपसरपंच व सर्व सदस्य मंडळांचे मोलाचे योगदान लाभले .

बातमीचा व्हिडीओ पहाण्यासाठी QR कोड स्कॅन करा

K.M.B.S. NIGHUTE MEMORIAL FOUNDATION, SANGAMNER
LOTUS
ENGLISH MEDIUM SCHOOL &
JUNIOR COLLEGE
NURTURING EDUCATION WITH PASSION..!
Nursery to 10 CBSE and 11th&12th Science
संगमनेर व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबत
आधुनिक विचारसरणी आणि सांस्कृतिक व अध्यात्मिक मूल्ये जपणारी शाळा
CBSE Affiliated School
Hostel, Mess Facility
50000 Sqarefeet school & Hostel Building
Daily Meditation & yoga
Bus Facility
Digital Classrooms
CCTV Coverage
Well Equipped Science Labs, Computer Labs & Digital Library





महाराष्ट्र शासनाच्या 'स्वच्छ शाळा अभियान' अंतर्गत पुरस्कार विजेती शाळा
नामांकित 'इंग्रजी माध्यम शाळा' अंतर्गत निवड
11 वी आणि 12 वी तसेच JEE, NEET, CET ची तयारी करवून घेण्यासाठी अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन!
परीक्षेची संपूर्ण तयारी स्कुल मध्ये करवून घेतल्यामुळे प्रायव्हेट ट्युशनची गरज नाही.
मोफत इंग्रजी शिक्षणाची सुवर्णसंधी !
राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शिक्षण योजने अंतर्गत
धनगर समाजातील (NTC) विद्यार्थ्यांसाठी
इ. १ ली ते १२ वी साठी मोफत शिक्षण
आधुनिक शिक्षण
अनुभवी शिक्षक
सुंदर शैक्षणिक परिसर
आवश्यक कागदपत्रे
उत्पन्नाचा दाखला (रु. 1 लाखांच्या आत)
जातीचा दाखला
आधार कार्ड (आई, वडील, विद्यार्थी)
आजच संपर्क करा
- संपर्क -
9561901691, 9511864451, 9130512814, 8830997122, 7875858327
Lotus English Medium School & Jr. College, संगमनेर - नगर रोड, वडगाव पान, संगमनेर - 422164
02425 261475 & 99222 71171 & & 89991 90650 & 95118 64451 | www.lotusems.in

# इंधनाची साठेबाजी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही - मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत सरासरीपेक्षा लक्षणीयरित्या मोठी वाढ झाली आहे. या वाढीव मागणीचा पुरवठा केला जात असतानाही राज्यात कृत्रिम टंचाईसदृश स्थिती निर्माण केली जात असल्याचे समोर आले आहे. 'शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या गरजेचा गैरफायदा घेऊन इंधनाची साठेबाजी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा साठेबाजांवर नागरी पुरवठा आणि गृहविभागाकडून संयुक्तपणे कडक कारवाई केली जाईल,' अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केली.



राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते. राज्यातील इंधनाच्या पुरवठ्याची आकडेवारी जाहीर करताना मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या राज्यात पेट्रोलच्या मागणीत सरासरीपेक्षा २३ टक्के, तर डिझेलच्या मागणीत तब्बल ५२ टक्के वाढ झाली असून सरकारकडून त्याचा पुरवठाही केला जात आहे. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये ही वाढ संशयास्पद आहे. अकोला जिल्ह्यात इंधनाचा खप १५४ टक्क्यांनी वाढला आहे, तर छत्रपती संभाजीनगर, बीड, भंडारा, बुलढाणा, गोंदिया आणि हिंगोली या भागांत ७० टक्क्यांहून अधिक खपत झाली आहे.

दुसरीकडे, व्यावसायिक (कमर्शियल) पेट्रोल-डिझेलचा खप मात्र कमी होताना दिसत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी असणारे इंधन व्यावसायिक ठिकाणी वळवून काळाबाजार किंवा साठेबाजी केली जात आहे का? याची सखोल पडताळणी करण्याचे आदेश गृह विभागाला देण्यात आले आहेत.

# 30 जूननंतर एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर कारवाई

जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर - केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील तरतुदीनुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक असून वाहनधारकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी केले आहे.




केंद्रीय मोटार वाहन नियमांनुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या वाहनांनाही एचएसआरपी बसविण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत.

जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याने परिवहन आयुक्तांनी यापूर्वी मुदतवाढ दिली होती. त्यानंतर आता १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर एचएसआरपी बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी न बसविलेल्या सर्व वाहनांवर (जुनी व नवी) मोटार वाहन कायद्यानुसार वायूवेग पथकाद्वारे कारवाई करण्यात येणार असून वाहनधारकांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता तातडीने एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहनही श्री. ठोके यांनी केले आहे.

एचएसआरपीसाठी अर्ज करताना महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाच्या **transport.maharashtra.gov.in** या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. वाहनांची ओळख, सुरक्षितता आणि बनावट क्रमांक प्लेटला आळा घालण्यासाठी एचएसआरपी प्रणाली महत्त्वाची असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# एसआयआर असंवैधानिक नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

मुंबई (वृत्तसंस्था)

पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीवेळी वादग्रस्त आणि प्रचंड चर्चेचा विषय ठरलेल्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण अर्थात एसआयआर मोहीम वैध असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने यासंदर्भात बुधवारी महत्त्वपूर्ण निकाल सुनावला. यावेळी खंडपीठाने आपले निरीक्षण नोंदवताना म्हटले की, निवडणूक आयोगाने (एश्रशलींळेप उेाारीीळेप) आपल्या अधिकाराचा वापर केला आहे. आपल्या अधिकाराच्या कक्षेबाहेर त्यांनी काहीही केलेले नाही. त्यामुळे एसआयआर मोहीमेला असंवैधानिक ठरवता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.



सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर संदर्भातली याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर यासंदर्भातील निर्णय राखून ठेवला होता. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर मोहीम वैध असल्याचा निकाल दिला. या प्रक्रियेला चुकीचे ठरवता येणार नाही. मतदार याद्यांचा फेरआढावा घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५० नुसार हा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. विशेष मतदार यादी पुर्ननिरीक्षण करण्याचे आणि सगळ्या मतदार याद्यांचे पुनरावलोकन करण्याचे अधिकार घटनेने दिले आहेत. संविधानातील निवडणूक आयोगाशी संबंधित कलमांमध्ये अनुच्छेदात लिहलं आहे, निवडणूक आयोपश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने या राज्यात एसआयआर मोहीम राबवली होती. त्यामध्ये निवडणूक यादीतील जवळपास ९० लाख मतदारांना वगळण्यात आले होते. या निर्णयानंतर प्रचंड गदारोळ झाला होता. निवडणूक यादीतून नावं वगळण्यात आलेल्यांमध्ये बहुतांश मुस्लीम मतदारांचा समावेश असल्याचा आणि हे जाणीवपूर्वक केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यापैकी काही मतदारांना पुन्हा मतदार यादीत पुन्हा सामावून घेण्यात आले होते. मात्र, हे प्रमाण अत्यंत नगण्य होते. यामुळे पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पडल्याचा आरोप विरोधकांनी केला होता.

# देवठाण रस्त्यावरील अपघातात युवकाचा मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले-देवठाण मार्गावरील सुगाव खुर्द हद्दीत सोमवारी (दि. २५) पहाटे झालेल्या भीषण अपघातात सिन्नर तालुक्यातील एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. भरधाव चारचाकी वाहनावरील नियंत्रण सुटून रस्त्यालगतच्या झाडावर जोरदार धडक बसल्याने हा अपघात घडला. दिगंबर शरद भांगरे (रा. नायगाव, ता. सिन्नर) असे मृत युवकाचे नाव आहे. स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिगंबर भांगरे हा आपल्या चारचाकी वाहनातून एक मोटारसायकल घेऊन अकोलेकडे येत होता. सोमवारी पहाटे सुमारे १.१५ वाजण्याच्या सुमारास सुगाव खुर्द परिसरात त्याच्या वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले. त्यानंतर वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर भरधाव वेगाने आदळले.




धडक इतकी भीषण होती की, दिगंबर भांगरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, वाहन चालविताना डोळ्यावर झोपेची झापड आल्याने हा अपघात घडला असावा, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच अकोले पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृत भांगरे हे अकोले शहरातील माळीझाप येथील बाळासाहेब मंडलिक यांचे भाचे असल्याचे समजते. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे नायगावसह अकोले व सिन्नर तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# NEET पेपरफुटी रॅकेटचा पर्दाफाश

## १० ते १२ लाखांत विकला जात होता पेपर

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील धागेदोरे आता लातूरमध्ये अधिकच मजबूत होताना दिसत आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाचे पथक गेल्या अनेक दिवसांपासून लातूरमध्ये तळ ठोकून आहे. मंगळवारी सीबीआयने या प्रकरणाशी संबंधित आणखी एका डॉक्टरची चौकशी केली. यासोबतच शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्या बॅचमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांचीही चौकशी करण्यात येत आहे.

या तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर आणि एनटीएमधील केमिस्ट्री विषयाचा पेपर सेटर पी. व्ही. कुलकर्णी यांनी नीट परीक्षेचा पेपर विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना लाखो रुपयांत विकल्याचा आरोप आहे. सीबीआयच्या हाती लागलेल्या आर्थिक व्यवहारांच्या नोंदींमधून अनेक पालकांनी मोटेगावकर आणि कुलकर्णी यांच्या खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रक्कम हस्तांतरित केल्याचे स्पष्ट झाले आहे. या व्यवहारांचे डिजिटल पुरावे तपास यंत्रणेकडे उपलब्ध झाले आहेत. सीबीआयच्या प्राथमिक तपासात पी. व्ही. कुलकर्णी आणि शिवराज मोटेगावकर यांनी मिळून नीट परीक्षेचा पेपर तब्बल १०ते १२ लाख रुपयांना विकल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. या व्यवहारांशी संबंधित ऑनलाईन ट्रान्झॅक्शनचे भक्कम पुरावे तपास यंत्रणेला मिळाले आहेत. विशेष म्हणजे, ज्यांनी हा पेपर खरेदी केला त्या काही पालकांनी पुढे आपल्या नातेवाईकांना आणि परिचितांना २ ते १० लाख रुपयांच्या मोबदल्यात तोच पेपर विकल्याची माहितीही समोर आली आहे.

तपासात शहरातील काही नामांकित डॉक्टरांनी आपल्या मित्रांच्या आणि जवळच्या व्यक्तींच्या मुलांपर्यंत हा पेपर पोहोचवल्याचेही उघड झाले आहे. या संपूर्ण प्रकरणात डिजिटल व्यवहार आरोपींसाठी मोठी अडचण ठरत आहेत. अनेक पालकांनी पेपर खरेदीसाठी लागणारी रक्कम थेट ऑनलाईन पद्धतीने ट्रान्सफर केली होती. त्यामुळे प्रत्येक व्यवहाराची नोंद उपलब्ध असून सीबीआयला तपासासाठी महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत.

# ७/१२ ला अखेरचा निरोप

## शहरी भागात प्रॉपर्टी कार्डची अंमलबजावणी

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील शहरांचा विस्तार वेगाने होत असताना महापालिका आणि नगरपालिकांमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांची 'ग्रामीण' ओळख आता कागदोपत्रीही पुसली जाणार आहे. या वाढीव क्षेत्रांमधील जमिनींचे ७/१२ उतारे आता कायमचे इतिहासजमा होणार असून, त्याऐवजी अधिकृत 'प्रॉपर्टी कार्ड' (मिळकतपत्रिका) देण्याचा मोठा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मुंबई, छत्रपती संभाजीनगर महापालिकेसह राज्यातील सर्वच वाढत्या शहरांना याचा मोठा फायदा होणार असून, मालमत्ताधारकांची मालकी हक्काच्या वादातून आणि प्रशासकीय कचाट्यातून कायमची सुटका होणार आहे. राज्यातील अनेक शहरांच्या हद्दीत कालांतराने आजूबाजूच्या गावांचा समावेश करण्यात आला.

मात्र, या नवीन हद्दींचे नगर भूमापन (सिटी सर्व्हे) रखडल्याने आजही तेथील जमिनींचा व्यवहार किंवा नोंदणी ७/१२ उताऱ्यांवरच होत होती. सिटी सर्व्हे नंबरऐवजी जुनेच गट नंबर किंवा सर्वे नंबर अस्तित्वात असल्याने मालमत्ताधारकांना आपली निर्विवाद मालकी सिद्ध करताना अनेक कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत होता. आता शासनाच्या नव्या निर्णयामुळे ही अडचण दूर होणार आहे. महसूल व वन विभागाने २६ मे २०२६ रोजी यासंदर्भातील



अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. सिटी सर्व्हे होणार: महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार या सर्व नव्या आणि वाढीव नागरी क्षेत्रांचे तातडीने नगर भूमापन (सिटी सर्व्हे) केले जाईल. संबंधित महापालिका वा नगरपालिकेला या सर्व्हेसाठी जिल्ह्याच्या भूमि अभिलेख अधीक्षकांकडे प्रस्ताव द्यावा लागेल. यासाठी लागणारा खर्च 'जिल्हा वार्षिक निधी' किंवा 'नगरोत्थान योजने'तून उपलब्ध करून तो भूमि अभिलेख विभागाकडे जमा करणे बंधनकारक असेल. निधी प्राप्त होताच भूमि अभिलेख विभाग सिटी सर्व्हे पूर्ण करेल. त्यानंतर जुने ७/१२ उतारे पूर्णपणे बंद करून नागरिकांना अधिकृत मिळकतपत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) वितरित केल्या जातील.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा

मुंबई (वृत्तसंस्था)

विधान परिषद निवडणुकीमुळे लागू झालेल्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीची प्रक्रिया रखडण्याची चर्चा सुरू होती. मात्र केंद्रीय निवडणूक आयोगाने या योजनेला मंजुरी दिल्याने कर्जमाफीच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे ३० जूनपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात 'दिलासा' पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, २ लाखांची कर्जमाफी ही शेतकऱ्यांची थट्टा असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.



महाराष्ट्रात सध्या विधान परिषदेची धूम सुरू आहे. त्यामुळे राज्यात निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीचा निर्णय या आचारसंहितेत अडकण्याची शक्यता होती. राज्यातील लाखो शेतकरी या निर्णयाकडे आशेने पाहत असताना कर्जमाफीचा निर्णय आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. राजकीय वर्तुळातही ही चर्चा रंगली होती. विशेषतः सरकारने यापूर्वीच कर्जमाफी संदर्भात पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करणे, बँकांकडून थकीत कर्जाचा तपशील मागवणे तसेच आर्थिक तरतुदी करणे आदी काम सुरू झाले होते. पण आचारसंहितेमुळे यावर पाणी फेरले जाण्याची शक्यता होती. मात्र आता निवडणूक आयोगाच्या परवानगीमुळे कर्जमाफीचा मार्ग मोकळा झाला आहे.

# राज्यात तीन दिवस पावसाचा 'यलो अलर्ट'

मुंबई (वृत्तंसस्था)

मराठवाड्यासह राज्यभरात बुधवार, २७ ते २९ मेपर्यंत पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मराठवाड्यात २, मध्य महाराष्ट्रात ३ तर विदर्भात ४ दिवस पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असून काही ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा पुणे वेधशाळेने दिला आहे.

दरम्यान सोमवारी झालेल्या पावसानंतर छत्रपती संभाजीनगरात मंगळवारी तापमान १.४ अंश सेल्सियसने घसरले. सोमवारी तापमान ४१.२ होते ते मंगळवारी ३९.८ अंश सेल्सियसवर आले. विदर्भ मात्र उन्हाच्या तडाख्यात होरपळत असून मंगळवारी राज्यातील सर्वाधिक ब्रह्मपुरी येथे ४६.६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. जळगाव, अहिल्यानगरात पारा ४० अंशाच्या वरच होता तर नाशिक, सोलापूरचा पारा ४० अंशाखाली होता. छत्रपती संभाजीनगर शहर व परिसरात सोमवारी पूर्वमोसमी सरींनी हजेरी लावल्यानंतर बुधवार व गुरुवारीही सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. पावसासंदर्भात यलो अलर्ट जारी करण्यात आला असून येणाऱ्या २ दिवसांत ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे.

# इराण पुन्हा युद्धाच्या तयारीत...

नवी दिल्ली - इराण अमेरिकेसोबत संभाव्य नवीन युद्धासाठी तयारी करत आहे. अल जझीराच्या अहवालानुसार, तेहरानला वॉशिंग्टनवर अजिबात विश्वास नाही आणि ते होर्मुझ सामुद्रधुनीला आपले सर्वात मोठे सामरिक शस्त्र मानत आहे. अहवालानुसार, इराणी अधिकारी तीन आघाड्यांवर काम करत आहेत लष्करी तयारी, देशांतर्गत समर्थन आणि मुत्सद्देगिरी. जरी चर्चेचा मार्ग खुला ठेवण्यात आला असला तरी, सैन्य आणि इराण रिव्होल्यूशनरी गार्ड्स कॉर्प्स उच्च सतर्कतेवर आहेत.

# अकोल्यात 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालय' सुरू

## शिक्षक, सामाजिक कार्यकर्त्यांचा पुढाकार

युवावार्ता (प्रतिनिधी)

मोबाईल आणि डिजिटल मनोरंजनाच्या वाढत्या प्रभावाच्या काळात आदिवासी समाजातील तरुण शिक्षक, कार्यकर्ते आणि अभ्यासकांनी वाचन, चिंतन आणि सांस्कृतिक जतन-संवर्धनाची चळवळ उभी करत अकोल्यात 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालय' सुरू केले. हे ग्रंथालय आदिवासी समाजाच्या इतिहास, लोकपरंपरा, भाषा, कला, निसर्गपूरक जीवनशैली आणि पूर्वजांच्या ज्ञानपरंपरेचे जतन व संशोधन करणारे केंद्र बनावे, अशी अपेक्षा विविध मान्यवरांनी व्यक्त केली.

सह्याद्री कोळी महादेव सांदण परिवार प्रतिष्ठानच्या अकोले येथील कार्यालयासह 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालया'चे उद्घाटन अनुक्रमे आमदार डॉ. किरण लहामटे व इतिहास संशोधक प्रा. डॉ. विलास गवारी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक व लेखक राजू ठोकळ होते.

यावेळी शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. नितीन तळपाडे, लेखक पी. सी. झांबाडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात आदिवासी कला, संस्कृती, भाषा, इतिहास, निसर्ग संवर्धन आणि निसर्गपूरक जीवनशैली या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. आदिवासी संस्कृती ही निसर्गकेंद्री असल्याचे सांगताना जंगल, डोंगर, नदी, पाऊस आणि शेती यांच्याशी समाजाचे अद्वैत नाते असल्याचे मान्यवरांनी अधोरेखित केले.

आदिवासी समाजातील पराक्रमी व्यक्तिमत्त्वे राघोजी भांगरे, रामा किरवा आणि लक्ष्मण खाडे यांचे चरित्र पुस्तक स्वरूपात प्रकाशन करण्याची सूचनाही यावेळी करण्यात आली.

सह्याद्री कोळी महादेव सांदण प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष संजय गोडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केलेला हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. नवोदय व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला, तसेच ५३६४ मीटर उंचीवरील एव्हरेस्ट बेस कॅम्प सर करणाऱ्या मनस्वी बांडे आणि त्यांच्या आई वैशाली बांडे या मायलेकींचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी संजय गोडे, मनोहर भांगरे, बबन बांबेरे, प्रशांत गवारी, विठ्ठल बांगर, कैलास सारोक्ते, यासह आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादीच्या बैठकीत सुनील तटकरे भावूक, मी बोलणारच - काय तो सोक्षमोक्ष लावा

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेसची मंगळवारी देवगिरी बंगल्यावर पार पडलेली बैठक अत्यंत वादळी ठरली. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये 'साईडलाईन' झालेले सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे दोघेच या बैठकीत चर्चेचा विषय ठरले. या बैठकीला प्रफुल पटेल यांनी मुंबईत असूनही दांडी मारली. तर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे या बैठकीसाठी आले पण त्यांनी यावेळी सुनावलेल्या कठोर शब्दांमुळे त्यांची आणि छगन भुजबळ यांची जुंपल्याची माहिती समोर येत आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण होऊ दिले आणि राष्ट्रवादी पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सातत्याने होतो. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी कालच्या बैठकीत आपल्या मनातील सगळी खदखद सुनेत्रा पवार यांच्यासमोर बोलून दाखवली.



अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुनेत्रा पवारांच्या हातात देणे, पक्ष एकसंध ठेवणे यात मी आणि प्रफुल पटेल यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, त्यानंतर उदभवलेल्या स्थितीमधे आमच्या दोघांवर टीका सुरु असताना पक्षाचा एकही आमदार अथवा नेता आमच्या बचावासाठी पुढे आला नाही. याशिवाय, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरुनही मी आणि पटेल दोघेच टीकेच्या तोफेच्या तोंडी गेलो. त्यावेळीही राष्ट्रवादी काँग्रेसमधील कोणीही पुढे येऊन आमची बाजू मांडण्याचा किंवा बचाव करण्याचा प्रयत्न केला नाही, असे सुनील तटकरे यांनी म्हटले. केवळ प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनीच टीकेचे धनी का व्हायचे? वरिष्ठ नेतृत्व याबाबत काही भूमिका घेणार आहे की नाही, असा सवाल सुनील तटकरे यांनी बैठकीत उपस्थित केला. तटकरे यांनी थेट पक्षनेतृत्त्वाला जाब विचारल्याने ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी तटकरेंना रोखण्याचा प्रयत्न केला. जे झालं ते झालं, आता त्यावर अधिक चर्चा न करता पुढे जाण्याची गरज आहे, असे भुजबळ यांनी म्हटले. मात्र, तटकरे यांनी भुजबळांच्या प्रयत्नाला न जुमानता आपले बोलणे सुरुच ठेवले. मी यावर बोलणार आणि याबाबत आता स्पष्टता यायला हवी, असे सुनील तटकरे यांनी ठणकावून सांगितले. या सगळ्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत एकप्रकारचा तणाव निर्माण झाला होता. विशेष म्हणजे सुनील तटकरे ज्यावेळी बोलण्यासाठी उभे राहिले त्यापूर्वीच पार्थ पवार हे तडकाफडकी बैठकीतून निघून गेले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
||जय श्रीराम||
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



# आंतर्राष्ट्रीय कला महोत्सवात लोककला स्पर्धेसाठी त्रिशा कदमची निवड

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

पुणे येथे अखिल लोककला सांस्कृतिक संस्थेने आयोजित केलेल्या भारत महोत्सव २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेत संगमनेरच्या त्रिशा सचिन कदम हिने लोकनृत्य स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून संगमनेरचे नाव उज्ज्वल केले. त्रिशाच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व्हिएतनाममध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कला महोत्सवामध्ये लोकनृत्य स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. ही संगमनेरच्या कला क्षेत्रासाठी अभिमानाची बाब



आहे.

यापूर्वीही त्रिशाने बालरंगभूमी परिषद, मुंबई - जल्लोष लोककलेचा नृत्यस्पर्धेत प्रथम क्रमांक, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, संगमनेर शाखेच्यावतीने आयोजित लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक, टीम ड्रीम लॉंचर, नाशिकच्या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

लोकनृत्य स्पर्धेबरोबरच त्रिशाने वेगवेगळ्या कला प्रकारात आपल्या कलेचा ठसा उमटवला आहे. ती सध्या अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता तिसरी वर्गात शिकत आहे. तिच्या या यशाबद्दल संगमनेर तालुक्यात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्नेहल उकिर्डेची सिप्लामध्ये निवड

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

संगमनेर येथील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एमबीए विभागातील विद्यार्थिनी तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनीलभाऊ उकिर्डे यांची कन्या कु. स्नेहल उकिर्डे हिची नामांकित औषधनिर्मिती कंपनी सिप्लामध्ये वार्षिक ८.५ लाख रुपयांच्या आकर्षक पॅकेजवर निवड झाली आहे.

स्नेहल उकिर्डे ही एमबीएच्या एचआर / मार्केटिंग शाखेची विद्यार्थिनी असून,



महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलमार्फत आयोजित करण्यात आलेल्या निवड प्रक्रियेत तिने उत्कृष्ट कामगिरी करत हे यश मिळवले आहे.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वेंकटेश सर, एमबीए विभाग प्रमुख डॉ. वृषाली साबळे, डॉ. सचिन खर्डे, डॉ. सचिन गुंजाळ, डॉ. सातव सर, डॉ. विनोद कुमार पठाडे सर तसेच प्रा. राशी यांनी अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठे यश संपादन करता येते, असे मत व्यक्त करण्यात आले.

# शहर पोलिसांची गोवंश प्रकरणात कारवाई

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर अवैध गोवंश वाहतूक व गोमांसासंदर्भातील कारवायांवर संगमनेर शहर पोलिसांनी मोठी धडक मोहीम राबवत महत्त्वाची कारवाई केली आहे. या मोहिमेत विविध ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी एकूण ३९ गोवंश ताब्यात घेतले असून त्यांची अंदाजे किंमत तब्बल २६ लाख ७० हजार रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी बकरी ईद सणाच्या अनुषंगाने जिल्ह्यात अवैध गोवंश व गोमांस प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २६ मेच्या रात्रीपासून २७ मेच्या पहाटेपर्यंत विविध भागांमध्ये पोलिसांनी छापेमारी मोहीम राबवली.

या कारवाईत संगमनेर शहर पोलीस ठाण्यात एकूण ८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या गोवंशाची सुरक्षित देखभाल करण्यासाठी त्यांना जिवदया गोशाळा, सांयखिडी (ता. संगमनेर) येथे पाठविण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या आदेशानुसार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही मोहीम यशस्वीरीत्या राबवली. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध गोवंश वाहतुकीत गुंतलेल्या घटकांमध्ये खळबळ उडाली असून, पुढील काळातही अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# प्रशिक्षण शिबिरातील विचार बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांनी पोहोचवा - ना. विखे

## शिर्डी येथे भाजपा कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग उत्साहात

शिर्डी (युवावार्ता प्रतिनिधी) -

भाजपा कार्यकर्त्यांसाठी अंत्योदयाचा मंत्र हा आत्मा, तर प्रशिक्षण पुस्तिका ही गीता असून, प्रशिक्षण शिबिरातील विचार बूथ स्तरापर्यंत व शेवटच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवले, तर प्रशिक्षणचा उद्देश सफल होईल, अशी भावना जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

शिर्डी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान २०२६ च्या समारोपप्रसंगी ना. विखे पाटील बोलत होते. यावेळी आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी आ. स्नेहलता कोल्हे, प्रदेश कार्यालयीन प्रभारी रवीजी अनासपुरे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अनिल मोहिते, राजेंद्र गोंदकर उपस्थित होते.

ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, या प्रशिक्षण शिबिराला वैचारिक अधिष्ठान होते. पक्षाचा विचार घेऊनच समाजातील सर्व क्षेत्रांत कार्यकर्ता म्हणून काम करताना पक्ष संघटना हेच आपल्या सर्वांसाठी बळ आहे. देशाच्या विकास प्रक्रियेलाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी




अंत्योदयाच्या मंत्राची जोड दिली.

प्रशिक्षण शिबिरामुळे आपल्या कार्याला गती मिळणार असून, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा अंत्योदयाचा आणि एकात्म मानवतेचा मंत्र आपल्या सर्वांसाठी आत्मा आहे. समाजाच्या शेवटच्या घटकाला विकास प्रक्रियेत सामावून घ्यायचे आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाचा विकास होईल, तेव्हाच देशाचा विकास होईल, हे उद्दिष्ट समोर ठेवून प्रत्येकाची वाटचाल असली पाहिजे. राजकीय व सामाजिक कार्यात आपली वैचारिक भूमिका स्पष्ट असली पाहिजे. 'राष्ट्र प्रथम' ही भावना आपल्या कृतीत असावी. पक्षाचे संस्कार हाच आपल्या कामाचा पाया असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या सुरू असलेल्या प्रत्येक कामाला विचारांची जोड आहे. म्हणूनच जगात देशाचे स्थान बळकट झाले असल्याकडे विखे पाटील यांनी लक्ष वेधले.

भारतीय जनता पक्षाचा एक प्रशिक्षित कार्यकर्ता म्हणून समाजातील सर्व क्षेत्रांत आपल्याला काम करायचे आहे. लोकांना पक्षाशी जोडायचे आहे. भाजप हा एक परिवार आहे, ही भूमिका घेऊन कार्यकर्त्यांना आपली कर्तव्ये बजावावी लागतील. चांगला संवाद, चांगले वर्तन आणि संघटना हे आपले बळ मानून पुढे जाण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

या प्रशिक्षण वर्गाचे स्वागत व प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी केले. सूत्रसंचालन सोशल मिडिया जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे यांनी, तर वर्ग प्रशिक्षण गीत सचिन भैरव व राजेश्वर श्रीराम यांनी सादर केले. वर्ग यशस्वी करण्यासाठी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर नगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे, कांचनताई मांढरे, अशोक पवार, उपाध्यक्ष किरण बोरुडे, शिर्डी मंडल अध्यक्ष रविंद्र गोंदकर, योगेश गोंदकर, आनंद बुधेकर, अशोक भुसाळ यांनी विशेष प्रयत्न केले.

# वृत्तनिवेदिका अश्विनी पुरी यांना "उत्कृष्ट सूत्रसंचालक" पुरस्कार प्रदान

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

संगमनेर तालुक्यातील साकूर जवळील बिरेवाडी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील कु. अश्विनी कमल किसनराव पुरी हिला ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने 'राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' चा उत्कृष्ट सूत्रसंचालक म्हणून पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे वितरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते नाशिक येथे प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्कार वितरणवेळी रिपब्लिकन सेनेचे युवा नेते ड. अमन आंबेडकर, राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे, नाशिकचे पोलिस आयुक्त संदीपजी कर्णिक, समाज कल्याणचे उप आयुक्त भगवानजी वीर, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेशजी गायकवाड, नाशिक मनपाचे सहायक उपायुक्त नानासाहेब साळवे, रिअल स्टार आसावरी बर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.

साकूरजवळील बिरेवाडी येथील कु. अश्विनी पुरी ही रहिवासी आहे. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असताना तिने नाशिकमध्ये पत्रकार क्षेत्रात निःपक्ष, निर्भीड वृत्तनिवेदिका करत आपल्या लेखणीच्या आधारे गगनभरारी घेऊन लोकाभिमुख समाजाच्या न्याय हक्कासाठी तात्काळ उभे राहून सामाजिक, राजकीय क्षेत्रात अग्रेसर राहून आपल्या पत्रकारिता क्षेत्रात भक्कम पाया उभा केला आहे. अत्यंत



कमी वयात अश्विनीने हे यश मिळविले आहे. तसेच पत्रकार क्षेत्रात आणि वृत्तनिवेदिका म्हणून तिने आगळा वेगळा नावलौकिक मिळविला आहे.

आपल्या जिद्दीने आणि मेहनतीने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात केलेल्या समाजसेवेच्या आधारे आजपर्यंत कार्यगौरव, बेस्ट न्यूज ंकर, बेस्ट व्हॉईस आर्टिस्ट, स्त्री शक्ती महिला सन्मान, नवदुर्गा, समाज रत्न, छावा गौरव, कर्तव्यदक्ष महिला, समाजभूषण, महाराष्ट्र पत्रकार रत्न, नारी शक्ती, श्री शक्ती, राष्ट्रीय रत्न, सुवर्ण रत्न, राज्यस्तरीय महिला रत्न, महाराष्ट्र पत्रकार दीपस्तंभ, नवरात्री आयकॉन, राज्यस्तरीय जीवनगौरव, महाराष्ट्र रत्न, छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव, शौर्य रत्न, राजमाता जिजाऊ असे विविध पुरस्कार कु. अश्विनी पुरी हिला मिळाले आहेत. तसेच कु. अश्विनी पुरी ही व्हॉईस ऑफ मिडिया डिजिटल विंगच्या प्रदेशाध्यक्षपदावर काम करत आहे. तसेच विविध सामाजिक संघटनेत देखील विविध पदांवर ती काम करत आहे. अश्विनी पुरी हिच्या याच कार्याची दखल घेत ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने तिचा गौरव केला आहे. उत्कृष्ट सूत्रसंचालक म्हणून अश्विनी पुरी हिला पुरस्कार मिळाल्याबद्दल साकूर पठारभागासह, संगमनेर, अहिल्यानगर व गोसावी समाज बांधव तसेच विविध क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# ग्रीन फील्ड महामार्ग शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत माजी मंत्री थोरात यांचा थेट नितीन गडकरींना फोन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

संगमनेर तालुक्यातून जाणाऱ्या सुरत-चेन्नई या ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींना अत्यंत कमी मोबदला दिल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा, या मागणीसाठी या सर्वपक्षीय शेतकरी शिष्टमंडळाने माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली आहे. आपण शेतकऱ्यांच्या पाठीशी असून, शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मिळावा, याकरता माजी मंत्री थोरात यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना फोन लावला.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे तळेगाव भागातील विविध गावांमधील शेतकऱ्यांनी माजी मंत्री थोरात यांची भेट घेतली. यावेळी माजी उपसभापती अविनाश सोनवणे, कारखान्याचे संचालक संपतराव गोडगे, हौशीराम सोनवणे, डॉ. संदीप गोर्डे, किसनराव सुपेकर, विलास मास्तर सोनवणे, शिवनाथ गोरडे, संपत गोर्डे, रावजी गोर्डे, विलास गोर्डे, रवींद्र गोर्डे, प्रकाश सुपेकर, दत्तात्रय गोर्डे, मेजर बाळासाहेब गोर्डे, सचिन गोरडे, बाळासाहेब कोते यांच्यासह विविध शेतकरी बांधव उपस्थित होते. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा अहिल्यानगर जिल्ह्यातून जात असून, जिल्ह्यात या महामार्गासाठी १०८३.८८ हेक्टर जमीन संपादित केली जात आहे. संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव, तळेगाव, अजमपूर, आरामपूर, वरझडी बुद्रुक, वरझडी खुर्द, हसनाबाद, जुने गाव, लोहारे, कासारे, सादतपूर, चिंचपूर या गावांमधील मोठ्या प्रमाणात शेतजमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. २०२१-२२ मध्ये भूसंपादनाचा आराखडा मंजूर झाला होता.

यानुसार जमिनीसाठी अत्यंत कमी भाव दिला आहे. एकरी सात ते दहा लाख इतका भाव दिल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. शेतकऱ्यांच्या फळबागा, डाळिंब, भाजीपाला अशी नगदी पिके या शेतीमध्ये असून, माजी मंत्री थोरात यांच्या पाठपुराव्यातून निळवंडे धरणाचे पाणी आल्याने शेतकऱ्यांनी बागायत केली आहे. पाटाच्या कडेला आणि सर्व तळेगाव भागामध्ये जमिनीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले असून, संपादित केलेल्या जमिनीला खूप कमी भाव दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, या बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा चांगला भाव मिळावा व शासनाने संपादित केलेल्या जमिनीचे फेरमूल्यांकन व्हावे, अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यानंतर माजी मंत्री थोरात म्हणाले, शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य भाव मिळाला पाहिजे, ही शेतकऱ्यांची मागणी अत्यंत योग्य आहे. यूपीए सरकारच्या काळात शासकीय कामांसाठी किंवा रस्त्यांसाठी संपादित केल्या जाणाऱ्या जमिनींना चांगला भाव मिळावा, यासाठी सोनिया गांधी यांनी सातत्याने पुढाकार घेतला. आणि त्यानुसार विविध भागांमध्ये संपादित केलेल्या जमिनीला काँग्रेस आघाडी सरकारने शेतकऱ्यांना जमिनीचे चांगले भाव दिले. संगमनेर तालुक्यातही नाशिक-पुणे महामार्गासाठी शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला. शेतकरी स्वतःची जमीन देतो आहे. त्यामुळे त्याला रास्त भाव मिळाला पाहिजे, ही मागणी योग्य आहे आणि आपण याकरता सातत्याने शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत, असे सांगितले. फोनवरील संवादात त्यांनी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची व्यथा मांडत या शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळावा, अशी मागणी केली. यानंतर नितीन गडकरी यांनी माजी मंत्री थोरात यांना शेतकऱ्यांच्या या मागणीबाबत नक्कीच सकारात्मक प्रतिसाद दिला.

# शेतकरी मुलांच्या विवाह प्रश्नावर 'नवरदेव'ची जनजागृती; नारायणगावात ७५ वा शो उत्साहात






नारायणगाव (प्रतिनिधी)-

शेतकरी मुलांच्या लग्नाच्या ज्वलंत सामाजिक प्रश्नावर भाष्य करणाऱ्या 'नवरदेव' या चित्रपटाचा ७५ वा शो पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथील लक्ष्मी मल्टिप्लेक्स थिएटरमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

चित्रपट प्रदर्शनादरम्यान अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पावसाची पर्वा न करता शेतकरी बांधवांसह महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विशेष बाब म्हणजे संगमनेर तालुक्यातील शेतकरी नेते संतोष रोहम यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कोरोना काळात दोन्ही डोळ्यांची दृष्टी गमावूनही त्यांनी चित्रपट प्रत्यक्ष उपस्थित राहून ऐकला. चित्रपटातील संवाद, कथानक आणि विषयानुरूप गाण्यांनी त्यांना विशेष भावूक केले. स्वतः दृष्टीहीन असतानाही त्यांनी चित्रपटाचे तोंडभरून कौतुक केले.

दोन तास पंचवीस मिनिटे प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या या सामाजिक चित्रपटाबाबत बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, शेतकरी मुलांच्या विवाहाचा गंभीर प्रश्न समाजासमोर प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रत्येक गावातील स्वयंसेवी संस्था व शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन हा चित्रपट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा.

यावेळी उपस्थित प्रेक्षकांनीही उत्स्फूर्त प्रतिक्रिया देत चित्रपटाचे कौतुक केले. पत्रकार निरंजन देशमुख यांच्या 'नवरदेव' चित्रपटाचे राजू शेट्टी यांनी विशेष कौतुक करत, शेतकरी मुलांच्या लग्नाच्या गंभीर सामाजिक प्रश्नाची रुपेरी पडद्यावर प्रभावी आणि दर्जेदार मांडणी झाल्याचे सांगितले.

विशेष म्हणजे पत्रकार निरंजन देशमुख यांनी हा चित्रपट गावोगावी पूर्णतः विनामूल्य दाखवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यात्रा, जत्रा, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव यांसारख्या सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांमधूनही हा चित्रपट लोकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. या चित्रपटाची जमेची बाजू म्हणजे चित्रपट पाहिल्यानंतर अनेक महिला भावूक होत असून त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळताना दिसतात आणि त्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त करतात.

शेतकरी कुटुंबांच्या वेदना आणि वास्तवाला स्पर्श करणारा 'नवरदेव' चित्रपट समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृती घडवत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# संपादकीय...

## भारतात २४ तास वीज कधी मिळणार?

जगभरात सुरू असलेल्या युद्धसदृश परिस्थिती, वाढते भूराजकीय संघर्ष, ऊर्जा पुरवठ्यावर निर्माण होणारे ताण आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरता यामुळे आज प्रत्येक देशाला आपल्या ऊर्जासुरक्षेचा नव्याने विचार करावा लागत आहे. इराण, अमेरिका आणि होर्मुज सामुद्रधुनीभोवती निर्माण झालेल्या तणावाने पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले आहे की, तेल आणि ऊर्जा पुरवठ्याच्या मार्गांवरील अवलंबित्व किती धोकादायक ठरू शकते. भारताने २०३१ ते २०३५ या कालावधीसाठी जाहीर केलेल्या राष्ट्रीय निर्धारित योगदानामध्ये देशातील एकूण स्थापित वीज क्षमतेपैकी साठ टक्के क्षमता जीवाश्म इंधनाव्यतिरिक्त स्रोतांवर आधारित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट महत्त्वाकांक्षी असले तरी आता केवळ नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणे पुरेसे राहिलेले नाही. खरी गरज आहे ती विश्वासार्ह, सातत्यपूर्ण आणि सर्वसामान्यांना परवडणाऱ्या वीजपुरवठ्याची. भारताने आज सौर आणि पवन ऊर्जेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर क्षमता उभारली आहे. गैर जीवाश्म स्रोतांचा स्थापित क्षमतेत जवळपास निम्मा वाटा झाला आहे, मात्र प्रत्यक्ष वीज निर्मितीत त्यांचे योगदान अजूनही मर्यादित आहे. यामागे मुख्य कारण म्हणजे निर्माण होणारी ऊर्जा आणि ती प्रत्यक्ष गरजेच्या वेळी उपलब्ध होणारी ऊर्जा यामधील मोठी दरी. दिवसा प्रचंड प्रमाणात निर्माण होणारी सौरऊर्जा रात्री उपयोगी पडत नाही, तर पवनऊर्जेचे उत्पादन हवामानावर अवलंबून असते. त्यामुळे केवळ ऊर्जा निर्मितीच्या आकड्यांवर समाधान मानणे धोकादायक ठरू शकते. भारताची वीज व्यवस्था आजही प्रामुख्याने कोळशाभोवती उभी आहे. कोळसा आधारित व्यवस्था केंद्रीकृत आणि स्थिर स्वरूपाची होती. मात्र नवीकरणीय ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे संपूर्ण व्यवस्थेची रचना बदलण्याची वेळ आली आहे. झारखंड, बिहार, छत्तीसगड यांसारख्या औद्योगिक वाढ अनुभवणाऱ्या राज्यांमध्ये विजेची मागणी झपाट्याने वाढत असताना दुसरीकडे राजस्थानसारख्या राज्यांमध्ये सौरऊर्जेचा अधिशेष निर्माण होऊन ती वाया जात आहे. अनेक ठिकाणी सौरऊर्जेवर मर्यादा आणावी लागत आहे, कारण राज्यांतर्गत वीजजाळे ती ऊर्जा प्रभावीपणे वाहून नेण्यास सक्षम नाही. परिणामी एका बाजूला स्वच्छ ऊर्जा निष्क्रिय पडते, तर दुसऱ्या बाजूला अधिक खर्चिक औष्णिक वीज निर्मितीवर अवलंबून राहावे लागते. ही विसंगती दूर करणे अत्यंत आवश्यक आहे. देशाने केवळ मोठे ऊर्जा प्रकल्प उभारून थांबता कामा नये, तर राज्यांतर्गत वीजजाळे, उपकेंद्रे, संचयन व्यवस्था आणि अंतिम टप्प्यापर्यंतची वितरण क्षमता अधिक मजबूत करावी लागेल. ऊर्जा संक्रमणाचा पुढील टप्पा हा विस्तारापेक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा असणार आहे. यासाठी ऊर्जा संचयनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सूर्य मावळल्यानंतरही वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी मोठ्या प्रमाणावर संचयन प्रकल्प उभारावे लागतील. त्याचबरोबर विजेच्या बाजारपेठांची रचनाही बदलण्याची गरज आहे. आजही वीज केवळ उत्पादित आणि वापरलेल्या युनिट्सच्या आधारावर मोजली जाते. मात्र भविष्यात वीज ही केवळ उत्पादन नसून उपलब्धता, लवचिकता आणि तत्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता या तिन्ही बाबींचे मिश्रण असेल. जगातील अनेक प्रगत देशांनी या दिशेने पावले उचलली आहेत. कमाल मागणीच्या वेळी उपलब्ध राहणाऱ्या क्षमतेला स्वतंत्र मूल्य दिले जात आहे. भारतालाही याच दिशेने वाटचाल करावी लागणार आहे. अन्यथा स्वस्त सौरऊर्जा असूनही वीजटंचाईची समस्या कायम राहू शकते. या संपूर्ण संक्रमणातील सर्वात कमकुवत दुवा म्हणजे वितरण व्यवस्था. देशातील बहुतांश वितरण कंपन्या आजही आर्थिक तोट्यात आहेत. शेती आणि घरगुती ग्राहकांना मोठ्या प्रमाणात अनुदानित वीज देताना उद्योगांवर जादा भार टाकला जातो. परिणामी वीज व्यवस्थेचा खरा खर्च अस्पष्ट राहतो. वारंवार सुधारणा जाहीर झाल्या, तरी मूलभूत रचना बदलली नाही. त्यामुळे आता कृषी आणि गैर कृषी पुरवठ्याचे विभाजन, सौर आधारित कृषी फीडर, थेट लाभ हस्तांतरण आणि पारदर्शक अनुदान प्रणाली यांसारख्या उपाययोजना अधिक निर्णायकपणे राबवाव्या लागतील. महाराष्ट्रासह काही राज्यांनी या दिशेने सुरुवात केली असली, तरी ती व्यापक स्वरूपात देशभर पोहोचणे आवश्यक आहे. भारताचे ऊर्जा संक्रमण आता केवळ पर्यावरण संरक्षणाचा विषय राहिलेला नाही, तर तो राष्ट्रीय सुरक्षेशी थेट जोडला गेला आहे.






## जुनी हस्तलिखिते, ग्रंथ व शिलालेखांच्या डिजिटायझेशनसाठी 'ज्ञान भारतम्' उपक्रमात सहभागी व्हा - धर्मादाय उपायुक्त



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- ज्ञान भारतम्, संस्कृती मंत्रालयामार्फत भारतीय ज्ञान परंपरेचा वारसा जतन करण्यासाठी जुन्या हस्तलिखिते, ग्रंथ, शिलालेख इत्यादींचे सर्वेक्षण, संवर्धन व डिजिटायझेशन करण्याबाबतचा प्रकल्प हाती घेतलेला आहे. जिल्ह्यातील नोंदणीकृत न्यासांनी त्यांच्याकडे जुनी हस्तलिखिते, ग्रंथ, शिलालेख असल्यास ती ज्ञान भारतम् या मोबाईल ॲप्लिकेशनवर अपलोड करून भारतीय ज्ञान परंपरेचा अमूल्य ठेवा जतन करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन धर्मादाय उपायुक्त, न. वा. जगताप यांनी केले आहे.

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीबाबत आमचे अशिल यांनी रे.मु.नं. ३८०/२००० चा दावा मे. सिव्हील जज्ज साहेब, सि.डी. संगमनेर यांचे कोर्टात कै. भिका मनाजी सातपुते मयत वारस भाऊसाहेब भिकाजी सातपुते, रावसाहेब भिकाजी सातपुते, अनिता लक्ष्मण पानसरे व इतरांविरुध्द निरंतर ताकीद हुकूमासाठी त्याचप्रमाणे दावा मिळकतीची मोजणी करून मिळणेसाठी योग्य तो डायरेक्शनचा हूकूम होणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये मे. कोर्टाने मिळकतीची मोजणी करणेकामी मा. उप अधिक्षक भूमि अभिलेख, संगमनेर यांची कमीशनर म्हणून नेमणुक केलेली आहे. सदर मिळकतीची मोजणी लवकरच होवून त्याबाबत योग्य तो अहवाल मोजणी नकाशासह मे. कोर्टात संबंधीत मोजणी अधिकारी पाठविणार आहेत. त्याला शह देण्यासाठी कै. भिकाजी मनाजी सातपुते यांचे वरील वारसांनी दावा मिळकतीमध्ये हक्क सांगत असून त्याने आमचे अशिलाची मालकी नाकारलेली आहे व त्यामध्ये बांध फोडून दक्षिणेकडून अतिक्रमण केलेले आहे. सदरची दावा मिळकत आमचे मालकीची आहे असे आमचे अशिलास सांगत असून त्यांची मालकी नाकारलेली आहे. म्हणून आमचे अशिलाने दिनांक १४/०५/२०२६ रोजी मा. उप विभागीय अधिकारी, संगमनेर, मा. तहसिलदार संगमनेर, मा. मंडळधिकारी संगमनेर, मा. पोलीस निरीक्षक, शहर पो.स्टे. यांचेकडे नोटीस मिळकतीवर बेकायदेशिर अतिक्रमण, जबरदस्तीने ताबा दाखविणे, सरकारी मोजणीत अडथळा निर्माण करणे, धमक्या देणे याविषयी अर्ज दाखल केलेले आहेत. परंतु त्याबाबत संबंधीतांनी वरील इसमाविरुध्द काहीएक कारवाई केलेली नाही. उलट संबंधीत पो.स्टे. ने वरील इसमांना पाठीशी घातलेले आहे. त्यामुळे आपले कोणीच वाकडे करून शकत नाही या विचाराने त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकतीविषयी जास्तच त्रास देण्यास सुरूवात केलेली आहे.

त्याचप्रमाणे दावा मिळकतीविषयी आमचे अशिलाने संगमनेर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब, ज्यू.डी. यांचे कोर्टात रे.मु.नं. ४५७/२०१४ चा दावा - सालोमन शंकर दारोळे व इतरांविरुध्द म्हणजे एकनाथ कारभारी सातपुते, गोरक्ष कारभारी सातपुते, व जगन्नाथ कारभारी सातपते यांचे विरुध्द दाखल केलेला होता परंतु सदर दाव्यामध्ये आमचे अशिलाचे विरूध्द निकाल झाल्यामुळे आमचे अशिलाने मे. जिल्हा न्यायालय, संगमनेर यांचे न्यायालयात रे. दिवाणी अपील नंबर ७६/२०२४ चे दाखल केलेले असून मुळ दाव्याच्या हूकूमनाम्याला आव्हान दिलेले आहे. परंतु असे असतांनाही व मिळकतीविषयी वाद प्रलंबीत असतांना त्यांनी दावा मिळकतीच्या उत्तर बाजूने कंपाऊंडच्या भिंतीचे बांधकाम दिनांक १५/०५/२०२६ रोजी बेकायदेशिररित्या केले म्हणून त्यांना आमचे अशिलाने बांधकाम थांबविण्यास सांगितले असता त्यांनी ऐकले नाही म्हणून आमचे अशिलाने पो.स्टे.ला. लेखी अर्ज देण्यासाठी गेले असता त्यांना संबंधीत पोलीसांनी कार्यालयात येवू दिले नाही उलट कोर्टातून स्टे ऑर्डर आणा असे म्हणाले. त्याचा गैरफायदा घेवून वरील इसमांनी नोटीस मिळकतीमध्ये १५ बाय ४०० फुटाचे बांधकाम केलेले आहे. त्याचप्रमाणे यापूर्वी नोटीस मिळकतीची मोजणी दिनांक ०९/०२/२०२६ होवू दिली नाही व सरकारी कामात अडथळा आणला. तरी दिनांक २०/०५/२०२६ रोजी आमचे अशिलाने वरील इसमांविरूध्द बेकायदेशिर अतिक्रमण करणे, बांधकाम करणे, सरकारी मोजणीस अडथळा करून धमकावणे व जिवे मारण्याची धमकी देवून मानसीक त्रास देणे याबाबत मा. जिल्हाधिकारी साहेब, अहिल्यानगर, शहर पो.स्टे. संगमनेर व इतर ठिकाणी तक्रार अर्ज दाखल करूनही वरील इसमांविरुध्द कोणीही कारवाई केली नाही त्यामुळे सदरचे इसम हे आडदांड व नंगटपणे अतिक्रमण करून त्या जागेमध्ये प्लॉटींग करणे व त्याची विक्री करण्याची हालचाल चालू आहे. वास्तवीक पाहाता दिवाणी कोर्टामध्ये संगमनेर येथे प्रकरणे न्यायप्रविष्ट असतांना

वरील इसमांना कोणतेही हक्क प्राप्त होवू शकत नाहीत. तसेच त्यांनी अतिक्रमीत क्षेत्रामध् ये प्लॉट पाडून विक्री केल्यास खरेदीदार यांना कोणतेही कायदेशिर हक्क प्राप्त होणार नाहीत. तरी कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून सदरचे जाहिर नोटीसीने कळविले आहे.

**नोटीस परिशिष्ट:-**

**डि. अहिल्यानगर सब डि. ता. संगमनेर पैकी मौजे संगमनेर बु. येथील व संगमनेर नगर पालिका हददीतील शेतजमीन मिळकत.**

| स. नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १३२/५० | ० हे २२ आर | ०-७५ पैसे |

**यांसी चतु:सिमा** **पूर्वेस: - रस्ता,** **दक्षिणेस: १३२/५३**
**पश्चिमेस:- १३०** **उत्तरेस: - १३२/३१**

दिपक भास्कर दारोळे, संगमनेर
तर्फे व करीता
ॲड. श्री. अे. अेल. बऱ्हाटे पाटील
अहिल्यानगर. मो. नं. ९८२२२५९५४८

**स्थळ:-संगमनेर**
**दिनांक:-२४/५/२०२६**

**Dr.R. S. Gunjal Welfare Foundation**
**R. S. Gunjal College of B.Sc Nursing**
**Approved By Govt. of. Maharashtra and**
**Affiliated to Maharashtra University of health Science, Nashik At- Gunjalwadi Pathar, Chandanapuri Ghat, Tal- Sangamner, Dist- Ahmadnagar -422620,**
**Mob. No. 8237540432 8468816440**
**Email:-dr.rsgunjalbscnursing@gmail.com Website:-www.drrsgibscnursing.org**

RECRUITMENT

Application are invited from the eligible candidates for the following posts to the above said college/ institute

| Sr. No | Name of Post | Subject | No.of Post | Qualification | Category |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Vice-Principal | Any one of the Subject | 01 | M.Sc. Nursing | OPEN |
| 2 | Associate Professor | Community Health Nursing / Psychaiatric | 01 | M.Sc. Nursing | OPEN |
| 3 | Lecturer | Medical Surgical/ FON | 01 | M.Sc. Nursing | OPEN |
| 4 | Lecturer | Community Health Nursing / Psychaiatric | 01 | M.Sc. Nursing | OPEN |
| 5 | Tutor | | 06 | B.Sc. Nursing / M.Sc. Nursing | OPEN-02 OBC-01 SC-01 EWS-01 VJ (A) -01 |

Application along with resume and attested photo copies of all relevant certificate must reach to the college within 10 days from the date of advertisement published.

**Principal** **Secretary**

## वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठान आयोजित 'बाल संस्कार वर्गाचा' समारोप उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात मुलांवर भारतीय संस्कृती आणि नीतिमूल्यांचे संस्कार रुजावेत, या उदात्त हेतूने 'वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठान, संगमनेर' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल संस्कार वर्गाचा सांगता समारंभ नुकताच अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात पार पडला. १ मे ते २६ मे या कालावधीत चाललेल्या या संस्कार वर्गाला शहर व परिसरातील विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला.

उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करत लहान मुलांवर उत्तम संस्कार घडवण्यासाठी या २६ दिवसांच्या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या संस्कार वर्गात मुलांना प्रामुख्याने रोजची प्रार्थना, सूर्यनमस्कार, योगासने, मल्लखांब, तसेच रामरक्षा, मारुती स्तोत्र, मनाचे श्लोक आणि भगवद्गीतेचे श्लोक यांचे शुद्ध उच्चारणासह पठण शिकवण्यात आले. याव्यतिरिक्त, मुलांमध्ये शिस्त, एकाग्रता, ज्येष्ठांबद्दलचा आदर आणि सामाजिक भान निर्माण व्हावे, यासाठी विविध बौद्धिक सत्रे आणि पारंपरिक खेळांचेही आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या तज्ज्ञ पुरोहित आणि मार्गदर्शकांनी मुलांकडून हा सराव अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात करवून घेतला.

२६ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य सांगता समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र देशपांडे, कुटुंब प्रबोधन, मुकुंद डांगे, माजी प्राचार्य, हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी शिबिरात शिकलेल्या स्तोत्रांचे आणि मंत्रांचे अतिशय सुश्राव्य आणि लयबद्ध सामूहिक सादरीकरण केले. चिमुकल्यांच्या तोंडून ऐकलेले हे शुद्ध मंत्रोच्चार ऐकून उपस्थित सर्व पालक आणि मान्यवर भारावून गेले.

याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुण्यांनी वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणात आपली मूळ संस्कृती आणि संस्कार टिकवून ठेवण्याचे मोठे कार्य हे प्रतिष्ठान करत आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी शिबिरात नियमित उपस्थित राहिलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास जोशी गुरूजी यांनी केले. त्यांनी या उपक्रमामागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैभव उपासनी गुरूजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन समीर सराफ गुरूजी यांनी मानले. या समारंभास प्रतिष्ठानचे चेतन मुळे, स्वप्निल मुळे, त्रृषिकेश मुळे, महेश सांबरे, प्रमोद जोशी, ओंकार मुळे, अभय फडे, सौरभ मुळे, पदाधिकारी, पुरोहित वर्ग, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पसायदानाने या सोहळ्याची सांगता झाली.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
HASINA ARIF SHAIKH
TO NEW NAME AS
HASINA AARIF SHAIKH
ADD - VIJAY NAGAR, KURAN ROAD, TAL- SANGAMNER, DIST,- AHILYANAGAR, 422605

### संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डॉ. सुधाकर वसंत पेटकर रा. देवीगल्ली, कसबापेठ, संगमनेर. म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - २७७२/२ स.नं. - या ठिकाणी मध्ये नर्सिंग होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २७/०५/२०२६ **मुख्याधिकारी - संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
SHIFA AHMED BAIG MIRZA
TO NEW NAME AS
SHIFA AHAMAD BAIG MIRZA
ADD - 444/45, DEVI GALLI, SANGAMNER, TAL- SANGAMNER, DIST- AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
BALAMBHAI YASIN PATHAN
TO NEW NAME AS
BALAM YASIN PATHAN
ADD - SANGAMNER, TAL- SANGAMNER , DIST - AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
TARANUM BI A. RAHEMAN
TO NEW NAME AS
TARANUM BALAM PATHAN
ADD - SANGAMNER, TAL- SANGAMNER , DIST - AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
MUDSSAR PAPA SHAIKH
TO NEW NAME AS
MUDASSAR PAPA SHAIKH
ADD - 6, NAIKWADPURA, OPP DED COLLEEG, SANGAMNER, TAL- SANGAMNER , DIST - AHILYANAGAR












**पाहिजेत**

होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410

**पाहिजेत**

मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

# लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरचा महाराष्ट्रात डंका!

## "बेस्ट लायन्स क्लब" किताब; जागतिक पातळीवर गौरव

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

सामाजिक कार्य, सेवा, नेतृत्व आणि समाज परिवर्तनाच्या माध्यमातून संगमनेरचे नाव संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे, तर जागतिक स्तरावर पोहोचवणाऱ्या लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायरने अभूतपूर्व यश संपादन करत इतिहास रचला आहे. तब्बल ७५६ सदस्यसंख्या असलेला हा क्लब आज जगातील सर्वात मोठ्या सदस्यसंख्येच्या लायन्स क्लबपैकी एक ठरला असून, मल्टिपल डिस्ट्रिक्ट ३२३४ (संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास ५०० लायन्स क्लब) यामधून बेस्ट लायन्स क्लब म्हणून गौरविण्यात आला आहे. विशेष म्हणजे, क्लबच्या तब्बल २० वर्षांच्या इतिहासात प्रथमच हा सर्वोच्च सन्मान मिळाल्याने संगमनेरच्या सामाजिक क्षेत्रात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. लायन्स क्लब इंटरनॅशनल ही जगातील सर्वात मोठी सेवा संस्था मानली जाते. वी सर्व्ह या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन जगभरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, गरिबी निर्मूलन, महिला सक्षमीकरण, दिव्यांग सहाय्य आणि आपत्ती निवारण यांसारख्या विविध क्षेत्रांत कार्य केले जाते. त्याच परंपरेला पुढे नेत लायन्स क्लब संगमनेर सफायरने गेल्या वर्षभरात समाजोपयोगी आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची अक्षरशः मालिका राबवली.



क्लबने आयोजित केलेला सफायर बिझनेस एक्स्पो, एक हात मदतीचा, सफायर मॅरेथॉन, सफायर आयडॉल, महिला सक्षमीकरण अभियान, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण मोहीम, आरोग्य तपासणी शिबिरे, पर्यावरण संवर्धन मोहिमा, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजू विद्यार्थीनींना सायकल वाटप, गरजू कुटुंबांना अन्नधान्य वितरण, दिव्यांगांना सहाय्य साहित्य वाटप, सामाजिक जनजागृती मोहिमा, ग्रामीण भागातील शाळांना स्वच्छतागृहांचे वाटप, अशा विविध उपक्रमांद्वारे समाजात प्रभावी काम उभे केले. विशेष म्हणजे, प्रत्येक उपक्रमामागे समाजातील प्रत्यक्ष गरज ओळखून कार्य करण्याचा क्लबचा दृष्टिकोन दिसून आला.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मल्टिपल कन्व्हेन्शनमध्ये क्लबला तब्बल ११ प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. बेस्ट लायन्स क्लब पुरस्कारासाठी ड. कल्याण कासट, फॅमिली अँड वूमन मेंबरशिपसाठी नामदेव मुळे, जीईटी अचिव्हमेंट्स व इंटरनॅशनल प्रेसिडेंट सर्टिफिकेट तसेच मल्टिपल सर्टिफिकेटसाठी धनंजय धुमाळ, जीएमटी अचिव्हमेंट्ससाठी उमेश कासट, लायन्स इमेज बिल्डिंगसाठी श्रीनिवास भंडारी, पब्लिक रिलेशनसाठी सुमित मणियार, वूमन एम्पॉवरमेंटसाठी प्रियांका कासट, शायनिंग स्टार एमसीसी अवॉर्ड व मल्टिपल सर्टिफिकेटसाठी अतुल अभंग यांना सन्मानित करण्यात आले.

क्लबचे अध्यक्ष ड. कल्याण कासट, सचिव सुमित मणियार आणि खजिनदार नामदेव मुळे यांनी वर्षभर अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने नेतृत्व करत विविध सेवा प्रकल्प यशस्वी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबने सदस्यसंख्या वाढ, सेवा उपक्रम आणि समाजातील प्रभाव या तिन्ही क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. तसेच क्लबचे संस्थापक अध्यक्ष एम. जे. एफ. गिरीश मालपाणी, माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी, तसेच वर्षभर सातत्याने सक्रिय राहिलेले सर्व सदस्य, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या अथक परिश्रमामुळेच हा मान मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

या यशामुळे केवळ क्लबच नव्हे, तर संपूर्ण संगमनेर तालुक्याचा सामाजिक क्षेत्रातील नावलौकिक उंचावला आहे. सामाजिक बांधिलकी, सेवा आणि एकजुटीच्या बळावर सामान्य माणसांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याची ताकद लायन्स क्लब संगमनेर सफायरने पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. संगमनेरच्या सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद व्हावी, असे हे यश मानले जात असून, भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणात समाजोपयोगी कार्य करण्याचा निर्धार क्लबने व्यक्त केला आहे.

# गुंजाळवाडीतील गगनगिरी महाराज सप्ताह स्थळाची पालकमंत्र्यांकडून पाहणी



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथे होणाऱ्या स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह व भव्य कृषी महोत्सवाच्या पूर्वतयारीची पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ पाटील यांनी भेट देत पाहणी केली. तसेच सप्तास्थळी येणाऱ्या भाविकांची व्यवस्था आणि कृषी प्रदर्शन स्टॉलच्या नियोजनाचा धावता आढावा घेतला.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ पाटील हे जवळे कडलग येथे कार्यक्रमानिमित्त आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी गुंजाळवाडी येथे अधिक मासानिमित्त दि. ८ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत होत असणाऱ्या प. पू. गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहस्थळी भेट दिली. त्यावेळी सप्ताह कमिटीचे अध्यक्ष दिलीपराव शिंदे तसेच एस. आर. थोरात दूध उद्योग समूहाचे प्रमुख आबासाहेब थोरात यांनी या सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांची, निवास व्यवस्था, महाप्रसाद, वाहतूक नियोजन, कृषी प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांची तसेच कृषी महोत्सवाच्या तयारीची सविस्तर माहिती दिली.

यावेळी सप्ताह कमिटीच्या वतीने पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ पा. यांचा सन्मान करण्यात आला. सप्ताहस्थळी धार्मिक वातावरण निर्माण झाले असून, गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. यावेळी बन्सी महाराज गुंजाळ, महायुतीचे संदीप घुगे, जनार्दन आहेर, एस. आर. थोरात दूध उद्योग समूहाचे पृथ्वीराज थोरात, पोपट गुंजाळ, रोहिदास गुंजाळ, युवराज गुंजाळ यांच्यासह गगनगिरी महाराज भक्त मंडळ उपस्थित होते.

# दारूच्या नशेत ११२ वर खोटे कॉल, तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी) -

दारूच्या नशेत आपली पत्नी व मेव्हणे मारहाण करत असल्याची खोटी माहिती देत ११२ आपत्कालीन सेवा क्रमांकावर वारंवार कॉल करून पोलीस प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या वाघापूर येथील एका तरुणाविरुद्ध अकोले पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रोहिदास गोरक्षनाथ बर्डे (वय ३६, रा. वाघापूर) असे आरोपीचे नाव आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कॉन्स्टेबल मनोहर अशोक मोरे हे १५ मे, २०२६ रोजी अकोले पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असताना रात्री सुमारे ९.२६ वाजता ११२ नियंत्रण कक्षामार्फत रोहिदास बर्डे याचा कॉल प्राप्त झाला. यावेळी त्याने पत्नी व मेव्हणे मारहाण करून शिवीगाळ करत असल्याची तक्रार केली.

तक्रारीची गंभीर दखल घेत पोलीस कॉन्स्टेबल मोरे यांनी संबंधिताशी संपर्क साधला असता, तो मोठ्याने आरडाओरड करत सहा महिन्यांपूर्वी पत्नीविरोधात दिलेल्या तक्रारीबाबत विचारणा करू लागला. मोरे यांनी त्याला संबंधित तपास अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. मात्र, तो ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने ही बाब ११२ नियंत्रण कक्षाला कळवून कॉल बंद करण्यात आला. त्यानंतरही बर्डे याने वारंवार कॉल करून पोलीस यंत्रणेला त्रास देण्याचा प्रयत्न केला.

रात्री सुमारे १.२५ वाजता पोलीस उपनिरीक्षक घोडे, पोलीस कॉन्स्टेबल गोरे व मोरे हे शासकीय वाहनाने वाघापूर येथे गेले. तेव्हा मारुती मंदिरामागे उभा असलेला बर्डे पोलिसांना पाहताच आरडाओरड करू लागला आणि मी फाशी घेईन, अशी धमकी देऊ लागला. स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत पंचनामा करून त्याला ताब्यात घेण्यात आले. यानंतर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली असता, बर्डे याने मद्य अथवा अमली पदार्थांचे सेवन केल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद करण्यात आले.

चौकशीत त्याने केलेले सर्व कॉल खोटे असल्याचे तसेच दारूच्या नशेत पोलीस प्रशासनाला त्रास देण्याच्या उद्देशाने ११२ वर वारंवार फोन केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मनोहर मोरे यांच्या फिर्यादीवरून अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पत्रकारिता अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर

## भगवान अहिरे प्रथम, अ‍ॅड. राजू खरे द्वितीय



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिका कला, डी. जे. मालपाणी वाणिज्य आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालयात पत्रकारिता प्रगत अभ्यासक्रम पदविका परीक्षेचा निकाल ९५.४५ टक्के लागला आहे. यामध्ये भगवान अहिरे यांनी ७३.८२ टक्के गुण मिळवत पहिला क्रमांक मिळविला.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात पत्रकारिता प्रगत अभ्यासक्रम पदविकेचे प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा या दोन्ही पातळीवर, दोन्ही सत्रात विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या सहभाग नोंदवून हे यश मिळवले. यामध्ये २२ पैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण अकराशे गुणांच्या परीक्षेत पहिला क्रमांक भगवान अहिरे ८१२ गुण, दुसरा क्रमांक अ‍ॅड. राजू खरे ८०४ गुण, तिसरा क्रमांक अफसर शेख ७०७ गुण, चौथा क्रमांक शरद शिरोळे ६८५ गुण आणि पाचवा क्रमांक सुहास पठाडे ६५९ गुण, तसेच उर्वरित सोळा विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. संतोष खेडलेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे प्रमुख डॉ. संजय मालपाणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड व समन्वयक विजय पाटील यांनी कौतुक केले.

# महाराष्ट्रात मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम

## ९ कोटी ८६ लाख मतदारांची होणार प्रत्यक्ष पडताळणी

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

भारत निवडणूक आयोगाने २४ जून २०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्यासह एकूण १६ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशांत विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचा तिसरा टप्पा व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. संविधानाच्या कलम तीनशे सव्वीसप्रमाणे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी व्यक्ती भारताचा नागरिक व वयाची अठरा वर्षे पूर्ण असणे आवश्यक, या मूलभूत अटीची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोगावर असून, या अंतर्गत राज्यातील एकूण नऊ कोटी शहाऐंशी लाख चव्वेचाळीस हजार चारशे तेरा मतदारांच्या तपशिलाची प्रत्यक्ष पडताळणी जून ते ऑक्टोबर या कालावधीत केली जाणार आहे. मतदार याद्या दोषविरहित व अचूक असण्याच्या दृष्टीने व सर्व पात्र मतदारांचे नाव समाविष्ट करण्यासाठी या कार्यक्रमात सर्व मतदारांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

यापूर्वी देशामध्ये एकोणीसशे बावन ते छप्पन्न, सत्तावन्न, एकसष्ट, पासष्ट ते सहासष्ट, त्र्याऐंशी ते चौऱ्याऐंशी, सत्त्याऐंशी ते एकोणनव्वद, ब्याण्णव ते पंच्याण्णव व दोन हजार दोन ते दोन हजार चार या वर्षी विशेष सखोल पुनरीक्षण घेण्यात आले होते. मागील वीस वर्षांत केवळ विशेष संक्षिप्त पुनरीक्षण झाल्याने व शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्यामुळे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर समावेशन व वगळण्या झालेल्या आहेत. मतदारांनी नवीन जागी नाव नोंदविले, मात्र जुन्या ठिकाणचे नाव न वगळल्याने दुबार नावे वाढल्याची शक्यता असल्याने, लोकप्रतिनिधित्व अधिनियम एकोणीसशे पन्नासच्या कलम एकवीसनुसार आयोगाला मिळालेल्या अधिकारांतर्गत ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. देशात पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये व दुसऱ्या टप्प्यात नऊ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांत हा कार्यक्रम राबविल्यानंतर, आता तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा समावेश असून, जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून राज्यासाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, वीस ते एकोणतीस जून दोन हजार सव्वीस या कालावधीत गणना अर्जाची छपाई व एक लाख दोनशे त्रेपन्न मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर तीस जून ते एकोणतीस जुलै दरम्यान हे अधिकारी घरोघरी जाऊन सद्यस्थितीतील माहिती आधीच भरलेले गणना प्रपत्र मतदारांना वाटतील व भरलेले अर्ज परत घेतील. या प्रपत्रामध्ये मतदाराची किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची दोन हजार दोन ते दोन हजार चारमधील माहिती भरलेली असेल किंवा ती मतदाराला स्वतः भरता येईल व नवीन छायाचित्रही उपलब्ध करून देता येईल. प्रत्यक्ष गृहभेटीच्या वेळी जुनी माहिती भरणे शक्य व्हावे, यासाठी सध्याच्या मतदारांची जुळवणी जुन्या नोंदींशी करण्याचे काम सुरू असून, राज्यात आतापर्यंत बाहत्तर दशांश शून्य चार टक्के जुळवणी पूर्ण झाली आहे. मतदारांना आयोगाच्या संकेतस्थळावर केवळ राज्य, जिल्हा, विधानसभा मतदारसंघ व संपूर्ण नाव भरल्यास आपली जुनी माहिती सहज उपलब्ध होईल, जी त्यांनी अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी. घर बंद आढळल्यास अधिकारी किमान तीन वेळा भेट देतील, तसेच योग्यरीत्या भरलेले व सही केलेले प्रपत्र गोळा करण्यासाठी ते पुन्हा भेट देतील.

मतदारांना आपले गणना प्रपत्र ऑनलाईन पद्धतीनेही भरता येणार असून, प्राप्त प्रपत्रांचा विचार करून पाच ऑगस्ट दोन हजार सव्वीस रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. या याद्यांवर दि. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या काळात दावे व हरकती नोंदवता येतील व त्या तीन ऑक्टोबरपर्यंत निकालात काढल्या जातील. ज्या मतदारांची नावे जुन्या नोंदींशी जुळली नसतील किंवा त्रुटी असतील, त्यांना मतदान नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत नोटिसा पाठवल्या जातील. अशा व्यक्तींची यादी स्थानिक स्वराज्य संस्था, तहसीलदार कार्यालय, जिल्हा निवडणूक अधिकारी व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर संभाव्य कारणांसह प्रसिद्ध केली जाईल.

नोटिसा मिळालेल्या मतदारांना प्रपत्राच्या मागे दर्शविलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल. ओळख पुरावा म्हणून आधार वापरले जाते, तथापि आधार कायदा दोन हजार सव्वीसच्या कलम नऊप्रमाणे ते नागरिकत्वाचा पुरावा मानले जाणार नाही. ही सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यावर ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध होतील.

या संपूर्ण प्रक्रियेत राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन आयोगाने केले आहे. राज्यात सर्व राजकीय पक्षांनी आतापर्यंत फक्त १ लाख १३ हजार ५५८ प्रतिनिधी नेमले आहेत. दुबार व मृत व्यक्तींची नावे वगळणे, तसेच नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे अधिक अचूक होण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जास्तीत जास्त प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सविस्तर माहिती देण्यासाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे.


**सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर**
**ता. संगमनेर ४२२६०५ जि. अहिल्यानगर**

आमच्या संस्थेत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील प्रमाणे पदे भरणे आहे

| अ.नं. | पदनाम | एक जागा | शै. पात्रता |
|---|---|---|---|
| १ | माहिती तंत्रज्ञान विषय शिक्षक (विज्ञान व वाणिज्य) | ४ | MCA (Sci.) / MCS / M.Sc. (Computer) / BE (Computer) /BE(IT) |
| २ | निर्देशक | १ | BCS/ BSC (Computer) BCA (Science)/ Diploma in Computer |

सदरची पदे तात्पुरत्या स्वरूपातील असून मानधन तत्त्वावरील आहेत उमेदवारांनी आपला संपूर्ण अर्ज शैक्षणिक, व्यावसायिक व अनुभव प्रमाणपत्राच्या प्रतीसह मुलाखतीसाठी प्रत्यक्ष संस्था कार्यालयात दि. ५ जुन २०२६ रोजी स.१०.०० वाजता उपस्थित राहावे.

सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज,
संगमनेर-नाशिक रोड,
पाण्याच्या टाकीजवळ, संगमनेर

सेक्रेटरी चेअरमन


# पीक कापणी अहवाल सार्वजनिक करण्याची शेतकरी संघटनेची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील सर्व महसूल मंडळांचे सन २०२५ खरीप हंगामातील अंतिम पीक कापणी अहवाल (उंबरठा उत्पादन) आणि त्यासंदर्भातील स्थळ पंचनाम्यांच्या सत्य प्रती सार्वजनिक करण्यात याव्यात, अशी मागणी शेतकरी संघटना संगमनेर व तालुक्यातील विमाधारक शेतकऱ्यांनी केली आहे.

यासंदर्भात तहसीलदार संगमनेर यांना निवेदन देण्यात आले असून, अंतिम पीक कापणी अहवालांच्या स्थळ पंचनाम्यांच्या सत्य प्रती तसेच सॅटेलाईट इमेजेसच्या माध्यमातून तयार करण्यात आलेले पीक कापणी अहवाल विमाधारक शेतकऱ्यांच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

शासनाने पीकविमा भरपाई देण्यासाठी ठरवलेल्या निकषांनुसार पीक कापणी अहवाल स्थळ पंचनामा आणि सॅटेलाईट इमेजेसद्वारे प्राप्त झालेल्या पीक कापणी अहवालांच्या सरासरीवर अंतिम उंबरठा उत्पादन निश्चित केले जाते. या प्रक्रियेच्या आधारेच विमाधारक शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येते.

शेतकरी संघटनेच्या मते, हे दोन्ही अहवाल गोपनीय स्वरूपाचे नसून शेतकऱ्यांना वास्तविक परिस्थितीची माहिती मिळावी आणि प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी हे अहवाल सार्वजनिक करणे आवश्यक आहे. त्यामुळे संगमनेर तालुक्यातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना हे अहवाल उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.







पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्राव, जळजळ ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता शस्त्रक्रियाविना आणि सोपे उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
7219100100

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५५१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# पिंप्री-लौकी परिसराला वादळी पावसाचा तडाखा

## वीज कोसळून १० मेंढ्यांचा मृत्यू

## लिंबू बागांचेही मोठे नुकसान



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी- संगमनेर तालुक्यातील पिंप्री-लौकी अजमपूर परिसरात रविवारी सायंकाळी झालेल्या जोरदार मान्सूनपूर्व पा पावसाने आणि वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. या नैसर्गिक आपत्तीत रावसाहेब मुंढे या गरीब मेंढपाळ शेतकऱ्याच्या १० मेंढ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, त्यांचे सुमारे दीड ते दोन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

रविवारी सायंकाळी ६ ते ७ वाजेच्या सुमारास पिंप्री-लौकी अजमपूर परिसरात सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. याच दरम्यान रावसाहेब मुंढे यांच्या मेंढ्यांच्या वाड्यावर अचानक वीज कोसळली. या दुर्दैवी घटनेत १० मेंढ्या जागीच मृत्युमुखी पडल्या. घटनेची माहिती मिळताच भाजपचे सरचिटणीस व सामाजिक कार्यकर्ते भारत गिते यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पीडित शेतकरी कुटुंबाला धीर दिला. त्यांनी तात्काळ प्रशासनाला, तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि संगमनेरचे तहसीलदार धीरज मांजरे यांना परिस्थितीची कल्पना दिली. त्यानंतर सोमवार (दि. २५) रोजी सकाळी महसूल व ग्राम प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी सीताराम दातीर, बाळू दातीर, सचिन दातीर, विनोद लावरे, सुभाष गिते, पोलीस पाटील मच्छिंद्र चकोर, तलाठी आशुतोष वाकडे, संगीता भारत गिते आदी उपस्थित होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी संबंधित विभागाला तातडीने पंचनामे पूर्ण करून पीडित गरीब मेंढपाळ शेतकऱ्याला तात्काळ शासकीय मदत मिळवून देण्याचे आदेश दिले असल्याची माहिती भारत गिते यांनी दिली.

या वादळी पावसाचा फटका केवळ मेंढपाळांनाच नाही, तर परिसरातील लिंबू बागायतदारांनाही बसला आहे. या लिंबू बागायतदार शेतकऱ्यांचेही प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून त्यांना योग्य तो दिलासा द्यावा, अशी मागणी भारत गीते यांनी पालकमंत्र्यांकडे केली आहे.

# रघुवीर खेडकरांच्या 'पद्मश्री'ने संगमनेरचाही गौरव - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

तमाशा क्षेत्रातील ज्येष्ठ लोककलावंत तथा तमाशा महर्षी रघुवीर खेडकर यांना भारताच्या सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेला 'पद्मश्री' पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिल्लीतील राष्ट्रपती भवनात प्रदान करण्यात आला. ही संगमनेरकरांसाठी अत्यंत गौरवाची बाब असल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले. आमदार खताळ यांच्या पाठपुराव्यामुळेच ज्येष्ठ तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्र राज्य तमाशा फड मालक संघटनेचे अध्यक्ष आणि संगमनेरचे सुपुत्र रघुवीर खेडकर यांनी आपल्या असामान्य कलागुणांच्या जोरावर तमाशा ही लोककला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नव्हे तर थेट दिल्ली सारख्या राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठांवरही प्रभावी सादरीकरण करून या पारंपरिक लोककलेचा झेंडा उंचावला आहे. त्यांनी अनेक वर्षे राज्य व केंद्र शासनाकडून सन्मान मिळावा यासाठी प्रयत्न केले.



# संगमनेर तालुक्यातून १९ व्यक्ती हद्दपार

## अपर पोलीस अधिक्षक वाघचौरे यांचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुका महसूल स्थळ सीमा हद्दीत तब्बल १९ जणांना प्रवेशबंदी करण्यात आली असून या संदर्भातील अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि संभाव्य धोके टाळण्याच्या उद्देशाने श्रीरामपूर विभागाचे विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी हा निर्णय घेतला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे. हा प्रवेशबंदीचा आदेश शनिवारपासूनच (दि. २३ मे) लागू झाला असून, तो दि. २९ मे २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत कार्यान्वित राहणार आहे. या कालावधीत संबंधित व्यक्तींना संगमनेर तालुक्याच्या हद्दीत प्रवेश करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे.



यामध्ये संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अलीम जलील कुरेशी (रा. रावाडा, संगमनेर), हश्मी नासीर कुरेशी व मुदस्सर अब्दुल करीम कुरेशी (दोघेही रा. मदिनानगर, संगमनेर) कमर अली गुलाम दिलानी सौदागर, अनिस गुलाम हैदर कुरेशी (दोघेही रा. भारतनगर, संगमनेर) काशिद असद कुरेशी (रा. पुना रोड) आणि रेहान गुलाबनबी कुरेशी (जमजम कॉलनी, संगमनेर) यांचा समावेश आहे. तसेच संगमनेर तालुका पोलीस ठाणे अंतर्गत येणारे गणेश दगडू कदम (रा. करुले, ता. संगमनेर), यासीर अकबर कुरेशी (रा. जमजम कॉलनी, संगमनेर), अन्वर मोहमंद कुरेशी (रा. सुकेवाडी, ता. संगमनेर), बाळा रमेश रुपवते आणि सोमनाथ मारुती रुपवते ( समनापूर, ता. संगमनेर) यांच्यावरही बंदी घालण्यात आली आहे. अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भिमा दगडु कांगणे (रा. घोडसरवाडी ता. अकोले), सुनील भाऊसाहेब खरात (रा. कोतूळ ता. अकोले), सचिन सुदाम जाधव (रा. पोखरी बाळेश्वर, ता. संगमनेर) आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुबारक रशिद शेख (रा. आश्वी बुद्रुक ता. संगमनेर) व अन्वर नबाब शेख (रा. शेडगाव ता.संगमनेर), राजुर पोलीस ठाणे हद्दीतील शाहरुख निसार शेख (रा. इस्लामपूर चौक, कुरण ता. संगमनेर) व घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इकरार इसकार मोमीन (रा. बोटा ता. संगमनेर) अशा एकूण १९ जणांविरुद्ध हे प्रतिबंधात्मक आदेश काढण्यात आले आहेत.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
अधिकमास महोत्सव
खास जोडवे, पायल आणि सिल्वर कलेक्शन उपलब्ध
आकर्षक डिझाईन्स • ट्रेंडी कलेक्शन
सोने । चांदी । हिरे | अशोक चौक, संगमनेर. मो : ९३७२०१ २०४४

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अॉपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

RBM jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
आपल्यासाठी घेऊन आले आहे
अधिकमास
मोहत्सव निमित्त चांदी दागिन्यांच्या मजुरीवर 25% डिस्काऊंट
ऑफर फक्त १७ मे ते १६ जून पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/70661 49090

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25